# एम.बी.मोरे महीला महाविदयालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

शुक्रवार दि.२८ फेब्रुवारी २०२० रोजी **राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त** दरवर्षीनुसार एम.बी.मोरे महीला महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन पोस्टर प्रेझेंटेशन आणि पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन स्पर्धा आयोजित करण्यात आली.

एम.बी.मोरे महीला महाविदयालयाचा वनस्पतीशास्त्र विभाग आणि रसायनशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी कनिष्ठ महाविद्यालय आणि वरीष्ठ महाविद्यालय या स्तरावर पोस्टर आणि पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनसाठी विज्ञानावर आधारित विषय नेमून देण्यात आले होते. तसेच तालुक्यातील इतर महाविद्यालयातील स्पर्धक देखील मागविण्यात आले होते.

स्पर्धेसाठी डॉ. श्री. नितीन दळवे गुप लिडर आर ॲंड डी रोहा डाय केम आणि सौ. मधुरा चव्हाण अर्वन कम्प्युटर इंस्टीटयुट रोहा हे प्रमुख पाहुणे तसेच परिक्षक म्हणून लाभले.

विज्ञान दिनानिमित्त महीला महाविद्यालयातील तृतीय वर्ष विज्ञान वर्गात शिकर्णा या विद्यार्थिनींनी औद्योगिक विद्यालयातील आणि एम.बी.मोरे इंग्लिश स्कूलमधील इयत्ता ६ ते ९ वी वर्गातील विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेतील विविध उपकरणांची माहीती दिली.

या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन महीला महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्रमुख सौ.दिपाली वारंगे सहाय्यक प्रा.योगिता नेहेते प्रा. निकीता महाडिक व रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख आणि प्राचार्य श्री. प्रसन्न म्हसळकर सहाय्यक प्रा.प्रतिमा भोईर प्रा.दिपेश भगत प्रा.प्रतिक्षा घारगे प्रा.नवकेश भगत आणि सर्व विभागातील सहकारी यांनी केले.